# आ. सुरेश धसांनी शिफारस केलेला बीड नगरपरिषदचा अकाउंटंट गणेश पगारे आणि नीता अंधारे यांची तक्रार सीबीआयकडे?

## गणेश पगारे लेखापालचा अवैध पदभार त्वरित काढण्याची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी



तक्रारदाराला जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, निता अंधारे गणेश पगारेच्या दररोज तक्रारी ऐकायचा कंटाळा आला असल्याची प्रतिक्रिया जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेबाची यांनी दिली आहे.


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कंर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १६८ ■ गुरूवार दि.६ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 168 ■ Thursday Dt. 6 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# CBIच्या पत्राने मुख्याधिकारी निता अंधारे, गणेश पगारेचे धाबे दणाणले!

■ लवकरच बीड नगर परिषदेमधून नीता अंधारे गणेश पगारेची हकालपट्टी होणार?

■ बीडचे पालकमंत्री अजित पवारांना मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारींच्या तक्रारी जर सीबीआय कडे होत असतील तर मग बीडचे पालकमंत्री म्हणून तुम्ही कारवाई करावी या मागणीसाठी निवेदन देणार–दीपक थोरात.

■ केंद्रीय अन्वेषण ब्युरो, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. No.30/1 (sheikh)/2024 /PD(3070)/5071, दि.०१.१०.२०२४ निता अंधारे गणेश पगारेच्या तक्रारीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना का देत नाहीत. सि बी आय च्या पत्राला निताअंधारेकेराची टोपली?

■ W/P. 269/2023. हे प्रकरण हायकोर्टात चालू आहे का नाही? नितां अंधारेनी सागावं बीड नगर परिषदेच्या अकाउंटंट पदावर कार्यरत कसा व कोणाच्या आशिर्वादाने?

■ बीड नगर परिषदेला महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाने लेखापाल म्हणून धीरज नावाचा अधिकारी कर्मचारी दिला आहे नीता अंधारे त्यांना पदभार का देत नाहीत?

■ उद्या दैनिक महाराष्ट्र आरंभ करणार गणेश पगारे हटाव म्हणून जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी पत्राद्वारे मागणी सीबीआयचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांच्या हातात तक्रार असताना गणेश पगारेला कोणत्या नियमाने अकाउंटंट चा चार्ज दिला.?

■ दोनशे कोटीच्या घोटाळ्यात नीता अंधारे गणेश पगार यांचे संगमत करून घोटाळा केला का बीड शहरातील नागरिकांमध्ये चर्चा?

■ सीबीआय नवी दिल्लीचे पत्र आले तरी गणेश पगारे च्या विरोधातील अहवाल नितांत अंधारे जिल्हाधिकाऱ्यांना देता देईनात?

■ गणेश पगारे ला नेमकं नीता अंधारे का वाचत आहेत आता अजित पवारांनी बीड नगर परिषदेतील भ्रष्टाचार बाहेर काढला पाहिजे बीड शहरातील नागरिकांची मागणी.

■ केंद्रीय अन्वेषण ब्युरो नवी दिल्ली यांच्याकडे तक्रार व चौकशी चालू तरी गणेश पगारे कडे लेखा अकाउंटंट पदाचा पदभार कोणाच्या आशीर्वादाने?

■ गणेश पगारे नीता अंधारे यांनी आता बीड नगर परिषदेचे तिजोरी त्यांच्या घरीच नेऊन ठेवायला पाहिजे शासकीय नगर परिषदेतील शासकीय फायली व कॉम्प्युटर लॅपटॉप अनेक शासकीय कार्यालय कार्यालयातील नगरपरिषद चे साहित्य नीता अंधारे गणेश पगार यांच्या घरीच?

■ घरी बसून नीता अंधारे गणेश पगारे हाकतात कारभार मिनी नगर परिषद नीता अंधारे गणेश पगार यांच्या घरीच थाटले कार्यालय?

■ नवी दिल्ली केंद्रीय अन्वेषण ब्युरो विभाग कडे गणेश पगारेची लेखी तक्रार खाजा मी याची तक्रार दिल्लीमध्ये गाजली गणेश पगारे ला लवकरच कारवाईला सामोरे जावे लागणार?



**बीड । प्रतिनिधी**

**पालकमंत्री अजित दादा बीड नगरपरिषदेतला वाल्मीक म्हणजे गणेश पगारे आणि त्याला पाठीशी घालणारी नीता अंधारे मुख्याधिकारी आहेत तर नगर विकास मंत्रालय महाराष्ट्र शासन नगर विकास मंत्रालय महाराष्ट्र मुंबई यांना आलेल एक नवी दिल्ली केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) यांनी एक पत्र लिहिले आहे ते पत्र जिल्हाधिकारी बीड यांनी नीता आमदारांना पाठवून संबंधित प्रकरणाचा चौकशी अहवाल तात्काळ पाठवा म्हणून मागणी केलेली आहे परंतु इतर आमदार यांच्याकडून सीबीआय सारख्या महत्त्वाच्या तपास यंत्रणेला व त्यांच्या आदेशाला तसेच जिल्हाधिकारी बीड यांनी दिलेला आदेश झुगारून त्या पत्राला केराची टोपली दाखवण्यात आली आहे. बीड शहरातील एका खाजा मिया नावाच्या कार्यकर्त्यांनी सीबीआय दिल्लीकडे तक्रार केलेली आहे.**




या तक्रारीच्या अनुषंगाने बीड नगर परिषदेच्या क दर्जाचा असलेला कर्मचारी जो की सध्या लेखापाल अकाउंटंट या पदाचा गणेश पगारे हा अधिकारी असताना त्याला बीड नगरपरिषदेचा अकाउंटंट लेखापाल विभागाचा पदभार देण्यात आलेला आहे बीड नगर परिषदेमध्ये २०० कोटी रुपयांचा बोगस घोटाळा सहजपणे झालेला आहे यात तिळमात्र शंका नाही कारण बीड नगर परिषदेच्या गणेश पगारे नीता अंधारे यांच्या अनेक तक्रारी शासन दरबारी पडून आहेत तर बीड नगर परिषदेमध्ये सिमेंट रोड नाली रस्ते बांधकाम विभाग मार्फत झालेल्या डाग दुजेच्या रिपेरिंगच्या कामांमध्ये गणेश पगारे नीता अंधारींने अक्षरशः हात धुवून घेतले आहे बीड शहरांमध्ये गेल्या दहा वर्षातील जनरल बिलाच्या फाईलीच्यावर सीसी आरसी बदलून त्या ठिकाणी नवीन टाकून बोगस बिल त्यांनी अनेक ठिकाणी उचललेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर नीता अंधारे गणेश पगारे यांनी वसुली विभागातून कोट्यावधी रूपाचा भ्रष्टाचार या ठिकाणी केलेला आहे. यातील मात्र शंका नाही परंतु बीड शहरातील एका खाजा मी या नावाच्या सामाजिक कार्यकर्त्यांने बीड शहरात गणेश पगारे यांच्या विरोधामध्ये तक्रार दाखल केलेली आहे.

प्रामुख्याने पाहिले तर संबंधित तक्रार ही फक्त गणेश पगारेच्या नावाने आहे यामध्ये गणेश पगारे ची तक्रार बीड शहरातून बीड नगरपरिषदच्या आवक जावक विभागापासून ते दिल्लीच्या सीबीआयच्या पर्यंत गेलेली आहे महत्त्वाचा भ्रष्टाचार बीड नगर परिषद झालेला असताना सीबीआय नवी दिल्ली ने महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास



मंत्रालयामध्ये एक पत्र लिहिला आहे बीड नगर परिषदेतील क दर्जाचा कर्मचारी असलेला गणेश पगारेच्या चौकशीचा अहवाल पाठवावा म्हणून महाराष्ट्र शासनाला पत्र दिलं महाराष्ट्र शासनाने बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना एक पत्र लिहिले आहे की बीड नगर परिषदेतील भ्रष्टाचार आणि बरबटलेला लेखापाल अकाउंटंट गणेश पगारीचे सर्व तक्रारीच्या अहवाल तात्काळ शासनाला पाठविण्यासाठी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांना संबंधित विभागाने पत्र लिहिलेले आहे. बीड च्या जिल्हाधिकाऱ्यांनी लिहिलेल्या पत्राला नीता अंधारेकडून केराची टोपली दाखविण्यात येत आहे. तर नीता अंधारे सुद्धा गणेश



दिनांक : ०६/ ३ /2025

प्रति,
मा.जिल्हाधिकारी साहेब,

4) मा.आयुक्त तथा केंद्रीय गुन्हे अन्वेषण ब्युरो नवी दिल्ली भारत सरकार यांना पुराव्यासहीत तक्रार सादर.

आपला विश्वासू,

आवक, महसुल सहायक
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

पगारेच्या भ्रष्टाचारांमध्ये अडकल्यामुळे गणेश पगारेचा अहवाल न पाठवता गणेश पगारेला वाचविण्याचा प्रयत्न निता अंधारे करत आहेत. आज रोजी गणेश पगारेच्या बाबतीमधील सर्व तक्रारी या जिल्हाधिकारी यांच्याकडे असताना सुद्धा त्या ठिकाणी जिल्हाधिकारी दखल का घेत नाहीत. नीता अंधारे या चौकशी अहवाल का पाठवत नाहीत. जर सीबीआय सारख्या महत्त्वाच्या तपास यंत्रणेकडे गणेश पगारेची तक्रार असेल तर त्या ठिकाणी गणेश पगारे ला बीड नगर परिषदेचा लेखापाल अकाउंटंट चा पदभार कोणाच्या आदेशाने दिलेला आहे. हे तपासणी गरजेचे आहे. बीड नगर परिषदेला एक लेखापाल हा शासनाने दिलेला असताना सुद्धा त्याला मुख्याधिकारी निता अंधारे पदभार का देत नाहीत. असा सवाल या ठिकाणी बीड शहरातील नागरिकांना पडलेला आहे. तर गणेश पगारेच्या तक्रारीची एक कॉपी सीबीआयने महाराष्ट्र शासन नगर विकास मंत्रालय नगर रचनाकार विभाग बीड व बीडचे जिल्हाधिकारी यांना दिलेली आहे तरी पण जिल्हाधिकाऱ्यांना व निता अंधारे यांना गणेश पगारीच्या तक्रारीची फाईल दिसली नाही का किंवा नीता अंधारे यांनी नजरेआड केली का असा प्रश्न आता नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे. त्यामुळे मी दीपक थोरात उद्या गणेश पगारेच्या विरोधामध्ये सीबीआय दिल्लीचे पत्र हे जिल्हाधिकाऱ्यांच्या हातामध्ये देऊन बीड नगर परिषदेच्या अकाउंटंट पदाचा पदभार व लेखापालचा पदभार असल्यामुळे गणेश पगारे याला प्रचाराने अनेक वेळा तक्रारी आरोप असलेला भबीड नगर परिषदे चा अकाउंटंट गणेश पगारे चा पदभार तात्काळ काढण्यात यावा म्हणून जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहे. व लेखी तक्रार करत गणेश पगारे नीता अंधारे हटा म्हणून उद्या जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहे केंद्रीय अन्वेषण ब्युरो नवी दिल्ली ही भारत सरकारची एक विश्वासू यंत्रणा आहे. सीबीआयकडे तक्रार दिलेली असल्यामुळे गणेश पगारे आता चांगलाच बोत्यात आल्यामुळे गणेश पगारेची उचल बांगडी होणार हे मात्र नक्की आहे.




"बीड नगर परिषदेच्या अकाउंटंट म्हणून वसई म्हणून नीता अंधारे यांना पोचणारे आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी गणेश पगारे सारख्या भ्रष्ट अकाउंटंट ला बीड नगर परिषदेमध्ये पदभार देण्यात यावा व त्याची बदली करण्यात यावी म्हणून एक शिफारस पत्र आ. सुरेश धस यांनी दिले होते परंतु सुरेश धस यांनी दिलेला अकाउंटंट गणेश पगारे हा भ्रष्टाचारी निघाला आहे. बीड नगर परिषदेमध्ये नीता अंधारे गणेश पगारेनी २०० कोटी पेक्षा जास्त घोटाळा केलेला असताना त्याच्या शासन दरबारी तक्रार असताना मात्र आता गणेश पगारेची तर केंद्रीय अन्वेषण ब्युरो नवी दिल्ली यांच्याकडे तक्रार दिली आहे महाराष्ट्रातून दिल्ली कडे तक्रार जात असेल तर मग सुरेश धस्यांनी दिलेले अधिकारी हे बीडला शिफारस पत्र टक्केवारी दिले होते का अशी चर्चा आता बीडच्या नागरिकात होत आहे म्हणून सुरेश धस आता चांगलेच व त्यात आलेले आहेत बीड शहरातील नागरिक सुरेश धसा बद्दल आता वेगळा विचार करत असल्याची चित्र ऐकायला व पाहायला मिळत आहे.

केंद्रीय अन्वेषण ब्युरो, नवी दिल्ली यांचे संदर्भाधिन पत्राची प्रत सहपत्रासह यासोबत पाठविण्यात येत आहे.

सदर प्रकरणी तपासणी करुन नियमोचित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठविण्यात यावा, ही विनंती.

९२१.२१ २०२४ (विशाल कांबळे) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यानी जिल्हाधिकारी बीड याना पत्र पाठवून माहिती अहवाल सादर करावा म्हणून आदेशीत करत असं

एक प्रत्र बीडच्या मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड, जि.बीड यांना माहिती पाठवण्यासाठी पत्रकार करत आहेत परंतु त्या सध्या माहिती पाठवत नाहीत गणेश पगारे वाचवण्यासाठी मुख्याधिकारी नीता अंधारे सरसावले आले आहेत परंतु केंद्रीय शिक्षण विभाग दिल्ली सीबीआय यांच्या पत्राला जर नितांधार केला की तुटली दाखवत असतील तर नीता अंधारेनी भ्रष्टाचारांमध्ये आपलेही पाय रोल याचे चित्र स्पष्ट होत असल्याची चर्चा बीड शहरामध्ये ऐकायला मिळत आहेत.

संदर्भ :– केंद्रीय अन्वेषण ब्युरो, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. No.30/1 (sheikh)/2024 /PD(3070)/5071, दि.०१.१०.२०२४

# प्रकाश सोळंकेंना मंत्रीपद द्या

## लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. राज पाटील यांनी केली अजित दादांकडे मागणी

वडवणी । प्रतिनिधी

लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांचा वारसा खंबीरपणे चालवणारे माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार एक ज्येष्ठ व्यक्तिमत्व प्रकाश दादा सोळंके यांना कॅबिनेट मंत्री पद देऊन त्यांच्या अनुभवाचा फायदा बीड जिल्ह्यासाठी घ्यावा मराठवाड्यात ते एक ज्येष्ठ आणि चारित्र्यसंपन्न नेते आहेत. समाजामध्ये त्यांची ख्याती आहे. अशा नेत्याला जर बीड जिल्ह्यात मंत्रिपद दिले तर या जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था आणि समन्वय टिकून राहील मराठवाड्यात देखील पक्षाला त्यांचा फायदा होईल यासाठी प्रकाश दादांना मंत्रिपदाची संधी द्यावी अशी मागणी सरपंच परिषद महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड राज पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केले आहे.

याबाबत राज पाटील यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्राचे पहिले



उपमुख्यमंत्री सुंदररावजी सोळंके साहेबांचा खंबीर वारसा लाभलेले माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय नेते प्रकाश दादा सोळंके यांनी आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत विकासाच्या विविध योजना खेचून आणलेल्या आहेत. सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांना सोबत घेऊन चालणारा हा नेता कधीही चुकीच्या गोष्टीला थारा देत नाही. त्यामुळे चारित्र्यसंपन्न नेता म्हणून प्रकाश दादांची ख्याती महाराष्ट्रात आहे.

### शेतकऱ्यांना देखील होणार फायदा

प्रकाश दादा सोळंके यांनी उजाड माळरानावर कारखाना निर्माण करून या भागातील शेतकऱ्यांना नवसंजीवनी दिलेली आहे. कारखान्याच्या माध्यमातून उसाला चांगला भाव देऊन शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्यामध्ये त्यांनी भूमिका निभावलेली आहे. ठिकठिकाणी पाणी प्रकल्प, वीज प्रकल्प उभारून शेती उत्पन्न वाढीसाठी त्यांनी मोठी कामगिरी केलेली आहे. शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांना मिळाव्यात यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. त्यांना मंत्रिपद मिळाले तर मराठवाड्यासह बीड जिल्ह्यातील शेतकरी शेतमजुरांना देखील त्यांच्या अनुभवाचा मोठा फायदा होऊ शकतो.

आज बीड जिल्ह्याला प्रकाश दादा सारख्या एका चारित्र्यसंपन्न आणि सर्व समाजाला सोबत घेऊन जाणाऱ्या नेतृत्वाची गरज आहे. अशा नेत्याकडे जर मंत्रीपद दिले तर जिल्ह्यातील सामाजिक सलोखा निर्माण होईल आणि जिल्ह्याच्या विकासाला गती मिळेल. पक्षाला देखील नवसंजीवनी मिळून बीड जिल्हा आणि मराठवाड्यात पक्ष्याची ताकद वाढेल. कार्यकर्त्यांना चांगलं बळ मिळेल आणि बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा बसून प्रशासन देखील चांगलं काम करेल. सलग पाच वेळा आमदारकी पटकाविलेले प्रकाश दादा यांना समाजाच्या प्रश्नांची जाण आहे. लोकांची दुःख दूर करण्यासाठी त्यांनी आहोरात्र प्रयत्न केलेले आहेत. अशा या ज्येष्ठ नेत्याला मंत्रीपद देऊन त्यांना एक चांगलं काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी सरपंच परिषद महाराष्ट्राचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष तथा लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांनी केली आहे.

# सामाजिक सलोखा कायम टिकवण्याची गरज

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात काही दिवसापासून जाती जातीमध्ये द्वेष पसरवला जात आहे सामाजिक सलोखा बिघडत आहे जाती धर्माच्या नावावर द्वेष पसरवून स्वार्थ साधण्याच्या या काळात सामाजिक एकता कायम टिकवण्याची नितात गरज जातीय सलोखा टिकविण्यासाठी काँग्रेस पक्षाने सद् भावना यात्रा आयोजित केली असून सर्वांनी या सद्भावना यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभाग बीड शहर अध्यक्ष एमडी खमरोद्दीन यांनी केले आहे.



खमरोद्दीन यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की आज शेतकरी कष्टकरी शिक्षित युवकसह सामान्य जनता आर्थिक टंचाई महंगाई बेरोजगारी या समस्यांनी त्रस्त आहे सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे नागरिकांना समोरील संकटे वाढत आहेत अशा मुद्द्यावरून जनतेचे लक्ष इतरत्र वळण्यासाठी जाती जाती मध्ये द्वेष वाढवून सत्तेचा स्वार्थ साधला जात आहे ही मोठी शोकातील असून अशा वेळी देशात सामाजिक सलोखा कायम टिकविण्याचे गरजेचे असून सामाजिक एकता कायम राखण्याकरिता आपण सर्वांनी या सद्भावना

### सद्भवना यात्रेत सहभागी व्हा : एमडी खमरोद्दीन

यात्रेत सहभागी होण्याची आवश्यकता असल्याची गवाई खमरोद्दीन यांनी केली बीड जिल्हा ही संताची पवन भूमी आहे या पवन भूमीत विविध जाती धर्माचे लोक एकोप्याने राहतात आहेत ही संताची शिकवण आपल्या पिढीने जपली पाहिजे त्यामुळेच सामाजिक बंधुभाव वाढतो जिल्ह्यातील सामाजिक सलोखा बिघडत चालला असून तो पूर्वत करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने मस्साजोग ते बीड असे सद्भावना, यात्रेचे आयोजन केले असून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ खासदार रजनीताई पाटील माजी मंत्री अशोक पाटील माजी आमदार सिराजुद्दीन देशमुख युवा नेते फरीद भैया देशमुख जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत ही सदभावना यात्रा निघणार असून या सद्भवना यात्रेत सहभागी होऊन सामाजिक सलोखा जपण्यासाठी सहभागी होण्याचे आव्हान शहराध्यक्ष एमडी खमरोद्दीन यांनी केले आहे.




# बीड तालुका शिवसेना उबाठा पक्षाची आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार दि. ५/३/२०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता शिवसेना मध्यवर्ती संपर्क कार्यालयाच्या हॉलमधये जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका मीराताई नवले व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड तालुक्यातील सर्व शिवसेना पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी, किसान सेना व शिवसैनिक यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.

यावेळी बोलताना संपर्कप्रमुख परशुराम जाधव म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार मी मातोश्रीची दुत म्हणून आपल्या तालुक्यातील पदाधिकारी व शिवसैनिक यांच्याशी संवाद साधण्यासाठी आलो आहे, आपल्याला गेलेलं वैभव पुन्हा प्राप्त करायचे असुन त्यासाठी गटतट न बघता, हेवेदावे न करता जोमाने कामाला लागावे, जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर म्हणाले की, आम्ही मातोश्रीचे निष्ठावंत मावळे असुन विधानसभा निवडणुकीत इथल्या बहाद्दर शिवसैनिकांनी महविकास आघाडीचा मोठा पराभव होत असताना बीड मधुन आमदार निवडून दिला आहे. यापुढेही जोमाने काम करण्यासाठी सज्ज रहावे, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी सांगितले की, बीड तालुका हा १९८६ पासुन शिवसेनेला मानणारा तालुका आहे.

या तालुक्यातील शिवसैनिक बाळासाहेब व उद्धव साहेब यांना मानणारा शिवसैनिक आहे, इथून तीन वेळा शिवसेनचा आमदार निवडून आला आहे. २०२४ च्या निवडणुकीतही शिवसैनिकांच्या बळावरच महाविकास आघाडीचा उमेदवार विजयी झाला आहे,अशा या तालुक्याचा गेल्या ७ वर्षांपासून मला तालुकाप्रमुख या पदावर काम करण्याची संधी मिळाली हे माझ भाग्य आहे. यापुढे उद्धव साहेबांच्या आदेशानुसार तंतोतंत काम करुन पक्षवाढीसाठी मेहनत करीन असे सांगितले. या आढावा बैठकीला बीड तालुक्यातील पदाधिकारी, युवा सैनिक, किसान सेना व महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तरटेवाडीची गुणवत्तेची परंपरा कायम

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तरटेवाडी आयएसओ मानांकन मिळवलेली कमी लोकसंख्या असलेल्या वस्तीतील शाळा आहे. शैक्षणिकदृष्ट्या उत्कृष्ट विद्यार्थी गुणवत्ता असलेली इयत्ता पहिली ते सातवी वर्ग असलेली नावाजलेली शाळा आहे. या शाळेत शिरसमार्ग, तांदळवाडी, बंडाळवाडी या ठिकाणावरून विद्यार्थी येतात नवोदय शिष्यवृत्ती एमटीएस व इतर स्पर्धा परीक्षा मध्ये कित्येक विद्यार्थ्यांनी याच शाळेतून यश संपादन केले आहे. सन२०२४– २५ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या एमटीएस परीक्षेत प्राथमिक शाळा तरटेवाडी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश



मिळवले आहे. परीक्षेत एकूण ४७ विद्यार्थी बसवण्यात आले होते. त्यापैकी ३२ विद्यार्थी चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झालेले आहेत.

दि.४ मार्च२०२५ रोजी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी केंद्र प्रमुख श्री जायभाये सर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री संतोष कारंडे, उपाध्यक्ष श्री सतीश जगताप तसेच व्यवस्थापन समिती सदस्य पत्रकार श्री संचार उमाप उपस्थित होते. मार्गदर्शन करताना केंद्रप्रमुख श्री जायभाये सर शिक्षकांचे व यशस्वी विद्यार्थ्यांची कौतुक केले यापुढेही या शाळेचा नावलौकिक असाच वाढवावा असे ते म्हणाले.

शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष कारंडे यांनी शिक्षकांचे कौतुक केले. शिक्षक शाळेत विविध उपक्रम राबवतात. नवीन शैक्षणिक साधन तंत्र अध्यापनात वापर करण्यात येतो म्हणूनच विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्राप्त होते. आपल्या शाळेतुन उत्कृष्ट विद्यार्थी घडत आहेत आपल्या आपल्या शाळेच्या विकासासाठी आम्ही गावातून कुठेही कमी पडणार नाही शाळेला काही कमी पडू देणार नाही असे आश्वासन अध्यक्षांनी दिले. या यशासाठी मार्गदर्शक शिक्षक श्री बजगुडे सर श्री सुपेकर सर श्री खेडकर सर श्रीमती गवते मॅडम श्रीमती शिंदे मॅडम व श्रीमती ढास मॅडम यांनी प्रयत्न केले. व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष जगताप सतीश यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आय एम विनर परीक्षा द्या आणि मिळवा रोख पारितोषिक : भागवत वैद्य

बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वैद्यकीन्ही येथील प्राथमिक शाळा मध्ये काल दुपारी पहिली ते सातवीच्या विध्यार्थ्यांना ध्येय प्रकाशन अकॅडेमी चे विभाग प्रमुख भागवत वैद्य, तालुका समन्व्यक राजश्री अजबे, मोहिनी मॅम, शिंदे मॅम यांनी मुला मुलीना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी ध्येय प्रकाशन अकॅडेमी चे विभाग प्रमुख भागवत वैद्य यांनी सांगितलं की, येणाऱ्या काळा मध्ये महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात बाहेरच्या राज्यातील आय ए एस अधिकारी येतात.

आपल्या महाराष्ट्र मध्ये हुशार विध्यार्थी नाहीत का? असा ही विध्यार्थी यांना प्रश्न विचारला असता मुलानी उत्तर दिले की आहेत. मग आय पी एस अधिकारी का होतं नाहीत तर त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. सर्व प्रकारचे मार्गदर्शन ध्येय प्रकाशन अकॅडेमी ऑनलाईन क्लास च्या माध्यमातून देणार



आहे. विध्यार्थी यांना पुस्तकं पण मिळणार आहेत. ऑनलाईन क्लास घेतला जाणार आहे,मोटिवेशनल कलाससेस घेतले जाणार आहेत. स्पोकन इंग्लिश कलाससेस घेतले जाणार आहेत, ध्येय प्रकाशन अकॅडेमी चे अप दिले जाणार आहे, युट्युब व्हिडीओ पाहायला मिळणार आहेत, तज्ज्ञ शिक्षक यांचे मोलाचं मार्गदर्शन मिळणार आहे. त्यावर प्रत्येक महिन्याला ऑनलाईन परीक्षा होणार आहे. वार्षिक परीक्षा देखील जानेवारी मध्ये होणार आहे. मुलानी पेपर कसे सोडविले आहेत. ते सर्व पेपर पालकांना आणि मुलांना पहिला मिळणार आहेत. आपण कुठे उत्तर चुकलो तर नाही ना त्या प्रश्नाला किती मार्क मिळाले. आपण अधिक काय लिहिले पाहिजे होते. हे पण कळणार आहे. पालकांनी जारतीत जास्त विध्यार्थी यांचे ॲडमिशन केले पाहिजे. आपले मुले भविष्यातील आय ए एस, आय पी एस अधिकारी जर करायचे असतील तर ॲडमिशन घेतले पाहिजे. पहिली ते दहावी चे विध्यार्थी ॲडमिशन घेऊ शकतात. वार्षिक परीक्षा फि फक्त पाचशे ते एक हजार रुपये एवढी आहे. संपर्क भागवत वैद्य ८४५९६९७३२८/राजश्री अजबे ८४५९२ ६९४२९ यांना संपर्क साधावा असे आव्हान ध्येय प्रकाशन अकॅडेमी महराष्ट्र यांनी केले आहे.

# जयदत्त क्षीरसागर यांना विधान परिषदेवर संधी द्यावी : शुभम धन्वे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हामध्ये एक अभ्यासू नेतृत्व दुरदृष्टी नेता म्हणून ज्याची ओळख आहे आशी आण्णासाहेबांनी जनतेसबोतची नाळ कायम तशीच असुन गेल्या काही वर्षामध्ये आण्णासाहेबांनकडे कोणतेही पद नसताना बीड मध्ये अनेक विकास काम केलेली आहेत सदैव लोकांच्या अडी अडचणी सोडवण्यासाठी तत्पर आसतात बीड जिल्हाचा विकास करण्यासाठी एक अभ्यासू नेतृत्व पाहिजे त्यासाठी आण्णासाहेबांना संधी देण्यात यावी आशी मागणी करण्यात येत आहे आण्णासाहेबांनी गेल्या काही वर्षापुर्वी जी विकास कामे केलेली आहेत व राहिलेले विकास काम पुर्ण करण्यासाठी आण्णासाहेब तत्पर आसतात आण्णानी केलेले बीड बायपास रोड बीड रेल्वेसाठी केलेला पाठपुरावा शेतकर्याच्या प्रश्न सोडवण्यासाठी सर्वाच्या पुढे असणारे आसे अनेक विकास कामे करून बीड मध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण करणारे यासाठी अनेक विकास कामे करण्यासाठी आण्णासाहेबांना विधान परिषदेवर संधी द्यावी आशी मागणी मा.जयदत्त आण्णा क्षीरसागर युवा मंच पेठ बीडचे शुभम धन्वे व बीड जिल्हातील जनतेतुन मागणी करण्यात येत आहे.



# जागतिक महिला दिनी बीडमध्ये रंगणार महिलांच्या व मुलींच्या कबड्डी स्पर्धा : रुक्मिणी नागापुरे

बीड । प्रतिनिधी

कोरो एकल महिला संघटना मराठवाडा व एकल महिला संघटना २०१४ पासून या संघटनेच्या कामाला सुरूवात झाली. कोरो इंडिया मुबंई च्या विश्वस्त सुजाताताई खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड मध्ये बैठक झाली यामध्ये ३२ महिला एकत्रित आल्या व महिलांनी (विधवा, परीतक्ता, घटस्फोट झालेल्या, पतीने सोडलेले, पतीला सोडलेले, अपंग, पौढ कुमारी, ट्रान्स,) एकलचे प्रश्न समोर मांडले. त्यावेळी अनेक गोष्टी लक्षात घेऊन या कामाची सुरुवात कोरो इंडिया च्या सुजाताताई यांच्या सहकार्य मूळ झाली शासकीय योजना, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक हिंसाचार, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक या मुद्द्यावर काम सुरू झाले आणि आज ही संघटना मराठवाडा ४ जिल्ह्यात ११ तालुक्यातील ४५० गावातील वीस हजार महिलांच्या सोबत जोमाने कार्य सुरू आहे इतकेच नाही तर महाराष्ट्र मध्ये ५ विभागात ही सुरू झाले आहे सर्व महिलांना माणूस म्हणून जगता यावे त्यांना मान सन्मान मिळावा, त्याही माणूस आहेत त्यांना देखील इतरांसारखे जगता यावे व महिलांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा आणि समानतेच्या दिशेने वाटचाल सुरू झाली पाहिजे

आज महिलांच्या सक्षमीकरण बाबत बोललं जातं खर? तर खरच महिला आता सर्व स्वतः निर्णय घेतात का ? महिलांना मनासारखे जगता येते का? महिलांना सर्व गोष्टी चे स्वातंत्र्य आहे का? किती महिलांना स्वतः च्या सासर व माहेरच्या संपत्तीत समान अधिकार मिळालेत ? किती महिला स्वतः मनासारखा आयुष्याचा जोडीदार निवडतात? किती महिला राजकीय सत्तेत सहभाग होतात ? ज्या सत्तेत आहे त्या स्वतः निर्णय घेतात का? यासारखे असंख्य प्रश्न आहेतच ?

मग आमच्या महिलांनी ग्राउंडवर स्वतः कबड्डी कधी खेळताना दिसल्या आहेत का? म्हणून एकल महिला संघटना ही महिलांसाठी मागील ६ वर्षांपासून महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करत असते एकल महिला संघटना ही जात,धर्म, लिंग, वर्ण, न पाहता तमाम महिलांच्या साठी काम करते ती महिला आहे ती एक माणूस आहे, ती कुठल्या धर्माची का कोणत्याही जातीची, असे विचार संघटना करत नाही. विशेष या संघटना चे ब्रीद आहे ज्यांचे प्रश्न त्यांचेच नेतृत्व म्हणजे महिलांचे प्रश्न आहेत तर संघटना चे नेतृत्व ही सर्व महिलाच करतात. आमच्या महिलांना कबड्डी खेळायची इच्छा झाली आणि उठली गेली ग्राउंड वर असे चित्र दिसले कधी आम्हाला ? मनात कुठली इच्छा झाली आणि ती पूर्ण झाली अस अजून तरी दिसून येत नाही. मग सर्व महिलांचे राज्य आले अस सहज कानावर पडते. काही अपवाद वगळता पुरुष सपोट करतात हे मान्य आहे. पण जेव्हा सुरुवात झाली कबड्डी साठी तेव्हा आमच्या महिलांना सराव करायला जागा उपलब्ध होत नाही, प्रशासन मदत करत नाही? कितीही प्रयत्न केले तर अडवलं जाते मग सत्तेत, पदावर महिला असली काय व पुरुष असला काय? महिलांना वेळ नाही, साडीवर खेळताना दिसतात कारण वेशभूषा बदल करू शकत नाही ? घरातून विरोध केला जातो किती बंधने आहेत? यासाठी पुरुष व्यवस्था यांनी विचार बदलाची गरज आहे? तिला तुम्ही सपोट करून पहा मग तिला डबल ताकतीने ती संसार करेल तिला पतीचे सहकार्य जर मिळाले न त्या कुटुंबात वाद होणारच नाही. आमच्या महिलांना काही लागत नाही. ती फार संघर्षशील आहे, सहनशील आहे? कसल्याही संकटाचा सामना करण्यासाठी ती तयार असते कमी पडते ती पतीचे म्हणून प्रेमाचे २ शब्द...

मग आपण २१ व्या शतकात असताना शिक्षण तर घेतले पण ते डोक्यात उतरवले नाही शिक्षण पूर्ण केले आणि हक्क तर मागतो कारण आता आम्हाला कायदे माहिती झाले आहे, अधिकार माहिती झालेत पण आम्ही महिला म्हणून अजून कुठं आहोत याकडे लक्ष दिले पाहिजे. गावपातळीवर काम करत असताना आम्ही महिलांवर इतक्या मोठ्या घरातील जबाबदारी टाकली आहे की, तिला स्वतः साठी स्वतः कडे पाहायला वेळच मिळाला नाही पाहिजे असं सर्व कामाच्या थप्प्या तिच्या पुढे रचल्यात आणि मग कुठं काही महिलांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आले असताना किती महिलांचा सहभाग असतो हे लक्षात येते. महिलांनी पण लक्षात घेऊन आता स्वतः साठी द्यावा माझ्यासाठी चांगले काय याचा विचार केला पाहिजे हे आयुष्य वाळूसारखं निसटून जात आहे वेळ कुणासाठी थांबत नाही स्वतःला वेळ द्यावा लागेल जगवून घेतले पाहिजे

एकमेकांचा तिरस्कार न करता समजून घेऊन बदल करावा आपल्याला शिवरायांच्या कार्य वाचावे लागेल, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार ऐकावे लागतीलच आपण रमाई, जिजाऊ सावित्रीबाई यांचा इतिहास समजून घेतला पाहिजे आणि फक्त महिलांनी नाही तर पुरुष युवकांना सुद्धा अभ्यास करण्याची गरज आहे. नेमके काय करायचं आहे आम्हाला? कोणत्या दिशेने वाटचाल करायची हा विचार करून भविष्यात आमची पुढच्या पिढीसाठी आता जागे होण्याची गरज आहे. चांगली पिढी तयार करू या व माणसासारखे वागू या दुसऱ्याची मुलगी आई बहीण हिच्यात आपली बहीण आई, मुलगी जर पाहिली तर अत्याचार होणारच नाही आम्ही संतांच्या भूमीत जन्माला आलो आहोत तर आमचे विचार ही तेवढे मोठेच असावेत.

एकल महिला संघटना ही संविधानिक मूल्यांवर काम करताना कोणताही भेदभाव न करता सर्व महिलांना आवाहन करते जागतिक महिला दिनानिमित्त कोरो एकल महिला संघटना च्या वतीने आयोजित महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धेत महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे दि ९ मार्च बीड रविवार संपर्क साधावा

रुक्मिणी नागापुरे कोरो एकल महिला संघटना ९०४९०३५४१५/ ७३८५५७७५२१

# ८२ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांसाठी १ कोटी ३२ लाख रुपयांची मागणी

## शेतकरी आत्महत्या प्रकरणी सरकार असंवेदनशील ; ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्ह्यात १जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत २०५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे. त्यापैकी १७३ शेतकऱ्यांची प्रकरणे पात्र तर २९ प्रकरणे अपात्र ठरवण्यात आली आहेत. चौकशीसाठी ०३ प्रकरणे प्रलंबित आहेत. १०८ शेतकरी कुटुंबाला मदत देण्यात आली असून ६३ जणांना मिळणे बाकी आहे.जानेवारी ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ४४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. त्यापैकी १७ प्रकरणे पात्र व ०२ अपात्र ठरले आहेत. चौकशीसाठी २५ प्रकरणे प्रलंबित आहेत. मागच्या वर्षातील ६३ व चालू वर्षातील १७ अशा एकूण ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित आहेत. ८२ शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांसाठी जिल्हा प्रशासनाने १ कोटी ३२ लाख रुपयांच्या निधीची मागणी करून दीड महिना उलटुनही अद्याप



निधी देण्यात आला नाही. त्यामुळे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार हे पालकमंत्री असुनही निधी वेळेवर मिळत नसेल तर उपयोग काय?! असा सुर शेतकऱ्यांमधुन उमटत आहे.खते बियाणे, शेती मशागत, पेरणी,पिकांना पाणी देणे आदी बाबी खर्चिक झाल्या आहेत. वेळेवर मदत न मिळाल्याने शेतकरी कुटुंबीय हवालदिल झाले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना मदत द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री यांना केली असून दि.१० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा दिला आहे.

### २०२४ मधील शेतकरी आत्महत्या

जानेवारी एकूण प्रकरणे १८ पात्र प्रकरणे १४, मदत दिलेली प्रकरणे १४, फेब्रुवारी एकूण प्रकरणे १२ पात्र प्रकरणे १२ मदत दिलेली प्रकरणे १२, मार्च एकूण प्रकरणे १२ पात्र प्रकरणे १२ मध्ये दिलेली प्रकरणे १२ एप्रिल एकूण प्रकरणे १३ पात्र प्रकरणे १२ मदत दिलेली प्रकरणे १२, मे एकूण प्रकरणे १३ पात्र प्रकरणे १२ मदत दिलेली प्रकरणे १२, जून एकूण प्रकरणे २९ पात्र प्रकरणे २४ मदत दिलेली प्रकरणे २३, जुलै एकूण प्रकरणे १४ पात्र प्रकरणे ११ मदत दिलेली प्रकरणी ०९ , ऑगस्ट एकूण प्रकरणे १४ पात्र प्रकरणे १२ मदत दिलेली प्रकरणे ०५, सप्टेंबर एकूण प्रकरणे १५ पात्र प्रकरणे १४ मदत दिलेली प्रकरणे ०३ , ऑक्टोबर एकूण प्रकरणे ०९ पात्र प्रकरणे ०९ मदत दिलेली प्रकरणे ०४ , नोव्हेंबर एकूण प्रकरणे २२ पात्र प्रकरणे १९ मदत दिलेली प्रकरणे ०४, डिसेंबर एकूण प्रकरणे ३२ पात्र प्रकरणे २२ मदत दिलेली प्रकरणी ०० एकंदरीतच गेल्या वर्षभरात एकूण प्रकरणे २०५ पात्र प्रकरणे १७३ मदत दिलेली प्रकरणे १०८ आहेत.

### तुटपुंजी मदत आणि तीसुद्धा वेळेवर नाही; उच्च न्यायालयाची अवमानना

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना पंधरा दिवसाच्या आत मदत मिळणे बंधनकारक असल्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश असताना तातडीने मदत न मिळणे, वैद्यकीय अहवाल तातडीने सादर न करणे, प्रकरणे प्रलंबित ठेवल्या प्रकरणात संबंधित जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना शासनाकडून एक लाख रुपयांची मदत दिली जाते. त्यातील ३० हजार रुपये धनादेशाद्वारे उर्वरित ७० हजार रुपयांची पोस्टात एफडी केली जाते. हि मदत आधीच तुटपुंजी असून त्यातुनही शासनाकडून निधी देण्यास विलंब होत असल्याने एकंदरीतच सरकार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांप्रती असंवेदनशील असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे.



# ग्रामसेवकास ११ हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले

माजलगाव । प्रतिनिधी
माजलगाव तालुक्यातील शिंपेटाकळी ग्रामपंचायतचे लाचखोर ग्रामसेवक श्री पवार यांना लाचलुचपत पथकाने माजलगाव शहरात रंगेहाथ पकडले शिंपे टाकळी ग्रामपंचायत अंतर्गत पंतप्रधान आवास घरकुल योजनेचे ११४ घरकुल मंजूर झाले आहेत परंतु सदर ग्रामविकास अधिकारी प्रती घरकुल १०–१५ हजार रुपये मागत असल्याचे वारंवार निदर्शनास आले होते. माझे पंचायत समिती काही काहीही करू शकत नाही व खुशाल तक्रार करा असे देखील ते वारंवार लाभार्थ्यांना धमकावत होते सदर प्रकरणात घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी पैशाची मागणी करण्यात आली होती. तक्रारदार परीस्थिती मुळे पैसे देवू शकत नव्हते. त्यामुळे त्यांनी लाच लुचप्रतिबंध विभागाशी संपर्क साधून या संदर्भातली तक्रार केली होती बुधवारी सायंकाळी ५च्या सुमारास पवार यांना माजलगाव शहरातुन ताब्यात घेण्यात आले.
शिंपेटाकळी गावातील अनेक नागरीकांनी पवार यांची वारंवार तक्रार करूनही त्यावर कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही त्यामुळे पवार यांना पाठीशी पारटकर तर घालत नाहीत ना असा सवाल नागरीक करत आहेत.

### शिंपेटाकळीचा विकास पवार यांनीच थांबवला

शिंपेटाकळी ग्रामपंचायत अंतर्गत भ्रष्टाचार करता येतील अशाच कामांचा ठराव घेऊन मनमानी पद्धतीने पवार यांनी केले आहेत त्यामुळे गावात इतर निधी देखील मिळत नाही परीणामी गावचा विकास खुंटला आहे मोठ्या प्रमाणात महसूल गोळा करून तो बुडवण्याच काम पवार यांनी केले असल्याचे आरोप गावकऱ्यांनी केले आहेत.

# महाराष्ट्र कामगार संघटनेच्या वतीने सुरक्षा संच गृहउपयोगी साहित्य वाटप होणार : अमर शेख

## खा. बजरंग सोनवणे यांच्यासह विविध मान्यवर राहणार उपस्थित





बीड । प्रतिनिधी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई आयोजित बीड जिल्हा महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना च्या वतीने दिनांक ८/३/२०२५ शनिवार रोजी बीड चे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या शुभस्ते आमदार संदीप क्षीरसागर यांच्या अध्यक्ष खाली विविध मान्यवर यांच्या उपस्थितीत व्हि आय पी हॉल तेलगाव नाका बीड येथे संपन्न होणार.
पुढे बोलताना संघटनेचे राज्य अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांनी म्हटले महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना बीड कामगार संघटनेने केलेला पाठपुरावा व जिल्हा कार्यकारणी ह्यांनी केलेल्या कामाची पद्धत बीड संह जिल्ह्यातील कामगार अडीअडचण दूर करण्या साठी केलेला प्रयत्नाला यश आले.
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई च्या वतीने राबवली जाणारे योजना कामगारांच्या हिता साठी संघटनेनी केलेले प्रत्नास यश दिनांक ८/३/२०२५ शनिवार रोजी सकाळी १० वाजता बीड खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या शुभ हस्ते बीड चे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या अध्यक्षा खाली तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.सुशीलताई मोराळे, अनिलदादा जगताप, शेख निजाम, राजेंद्रजी मस्के, सचिन मुलूक. परमेश्वर सातपुते, फारुक पटेलसंह विविध मान्यवर यांच्या उपस्थितीत पार पडणार असल्याचे नगरसेवक अमर शेख जिल्हा पदाधिकारी यांनी सांगितले.

# अमरसिंह पंडित यांना विधान परिषदेवर संधी द्यावी : सरपंच शितल साखरे

गेवराई । प्रतिनिधी
बीड जिल्ह्यामध्ये एक अभ्यासू नेतृत्व म्हणून अमरसिंह पंडित यांच्याकडे पाहिले जाते सदैव तळागाळातील जनतेसोबत जोडली गेलेली नाळ ही त्यांनी कधीच तुटू दिली नाही. लोकांच्या सुख दुःखात सदैव सहभागी राहिलेले आहेत. अशा नेतृत्वाला विधानपरिषदेवर संधी द्यावी अशी मागणी धोंडराईच्या लोकप्रिय सरपंच शितल साखरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.




शारदा प्रतिष्ठानच्या वतीने सतत काम करत आलेले आहे. विवाह सोहळा, आदर्श शिक्षक पुरस्कार, कोवीड काळामध्ये चालू केलेले सेंटर लोकप्रतिनिधी घरात बसलेले असताना आदरणीय साहेब हे गोरगरिबांच्या सेवेत होते, प्रश्न मतदारसंघातला असो किंवा सगळ्या बीड जिल्ह्यातला असो अडचण किंवा काम घेऊन साहेबांकडे गेला आणि तो रिकाम्या हाताने परत आला नाही. प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये साहेबांनी सहभाग घेतलेला आहे शेतकऱ्याचे प्रश्न असो पाण्याचा प्रश्न असो किंवा आणखी कुठलेही प्रश्न असं प्रत्येक गोष्टींमध्ये आदरणीय भैय्यासाहेब हे अग्रेसर असतात म्हणून अशी व्यक्ती विधानभवनामध्ये आवाज उठवण्यासाठी आवश्यक आहे. शेतकरी जेव्हा जेव्हा संकटात असतो तेव्हा आदरणीय भैय्यासाहेबांनी एक पाऊल पुढे टाकलेले आहे म्हणून त्यांना विधान परिषदेवर घेऊन जनसेवेची संधी देण्यात ही सामान्य कार्यकर्त्यांची भावना आहे.



# आसरडोह येथील आसरादेवी विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत उन्हाळी तासिका सुरू

धारूर । प्रतिनिधी
दि ३ मार्च सोमवार रोजी आसरादेवी विद्यालय आसरडोह येथे इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी तासिकेचे उद्धघाटन गावचे सरपंच रवी देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री ओव्हाळ सर व सर्व पालक उपस्थित होते.
उन्हाळी तासिका बाहेर खाजगी क्लासेस मध्ये लावणे गरिब विद्यार्थ्यांना परवडणारे नाही हीच बाब सरपंच देशमुख यांनी हेरुण हा उपक्रम सुरु केला. इयत्ता १० वी वर्गाचा शाळेत उन्हाळी तासिकेचा पहिला दिवस असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याला एक रजिस्टर आणि एक पेन शाळेचे मुख्याध्यापक श्री ओव्हाळ सर यांच्या कडून देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री घाडगे सर यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेचे सर्व कर्मचारी व शिक्षकवृंद यांची उपस्थिती व सहकार्य लाभले.

# जिल्हाप्रमुख सातपुते यांनी आष्टी मतदारसंघात शिवसेना पक्ष संघटना मजबूत केली : संपर्कप्रमुख जाधव

बीड । प्रतिनिधी
शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवा सेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब, शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब, शिवसेना मराठवाडा संपर्क नेते सुनील जी प्रभू साहेब, मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूरकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली,शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब अध्यक्षतेखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली आज पाटोदा शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आष्टी विधानसभा मतदारसंघातील आष्टी, पाटोदा, शिरूर तीनही तालुक्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची




महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.
यावेळी संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव साहेब व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी सर्व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत आप आपल्या कार्यक्षेत्रात चालू असलेल्या कार्याचा आढावा घेतला. सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन पक्ष संघटन वाढीसाठी तन–मन धनाने काम करावे गावोगावी शाखा कराव्यात असे आवाहन केले. व झालेल्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर खचून न जाता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेऊन जोमाने कामाला लागावे असे सांगितले.
यावेळी महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई माळी, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर, पाटोदा तालुका प्रमुख मुकूंदजी शिंदे, आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत, शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, महिला आघाडी पाटोदा तालुका प्रमुख प्रतिभाताई वनवे, युवासेना उपजिल्हा युवाधिकारी कृष्णाजी चौरे, युवासेना शिरूर तालुका युवाधिकारी साईनाथजी ढाकणे, युवासेना आष्टी तालुका युवाधिकारी शिवप्रसादजी जाधव, युवासेना पाटोदा तालुका युवाधिकारी अजिंक्यजी डोरले, शिवसेना उपतालुकाप्रमुख अक्षयजी साप्ते, आष्टी तालुका संघटक ज्ञानदेवजी मुटकुळे, शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख बिभिसेनजी बिसेन, युवा नेते आकाशजी कांकरिया, युवा नेते सोमनाथजी लवुळ सह शिवसेना, युवासेना, महिला आघाडचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# उमापूर येथील जिल्हा परिषद शाळेत २५ वर्षानंतर होणार स्नेहसंमेलन सोहळा

उमापूर । प्रतिनिधी
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, उमापूर तालुका गेवराई येथे ९ मार्च २०२५ रोजी शैक्षणिक वर्ष १९९९–२००० मधील इयत्ता १०वी विद्यार्थ्यांचा गेट–टुगेदर चा कार्यक्रम आयोजित केला आहे. २००० सालानंतर दहावीतील प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनी हे आप आपल्या क्षेत्राशी निघून गेले. कोणी नोकरी करत आहे तर कोणी व्यवसाय, तर काही शेतकरी आहेत कोणी व्यापारी. तर कोणी समाज सुधारक अशा विविध क्षेत्राशी जोडलेले विद्यार्थी आपल्या ताण तणावातून वेळ काढून बालपणाचे आयुष्य परत एकदा जगण्यासाठी व सर्व वर्ग मित्रांना भेटण्यासाठी, दहावीचे शिक्षण परत अनुभवण्यासाठी ९ मार्च रोजी



शाळेमध्ये एकत्र येत आहेत. पंचवीस वर्षानंतर प्रत्येकाचे जीवन हे बदललेलं आहे परंतु प्रत्येक विद्यार्थ्यास आपले सर्व मित्र भेटणार आहेत याची अगदी खुशी त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे.
या कार्यक्रमासाठी शाळेतील जुने शिक्षक मंडळी यांचीही हजेरी लागणार आहे त्यामध्ये श्री शाहूराव आहेर सर, महाजन सर, कंकाळ सर, कोंढरे सर, कदम सर, घोडेचोर सर, कावळे मॅडम, गरजे सर, जगताप सर, अशोक हवाले सर इत्यादी शिक्षकांचा सहवास लाभणार आहे. पंचवीस वर्षानंतर परत एकदा भेटण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनी या स्नेहसंमेलनाच्या यशस्वी साठी परिश्रम घेत आहेत.

# रेशीम कोष खरेदी सुरु करण्यासह गेवराई शहरात भुमिगत गटार योजना

## राबविण्याची आ.विजयसिंह पंडित यांची विधानसभेत मागणी

मुंबई । प्रतिनिधी

रेशीम शेतीचा प्रचार आणि प्रसार व्हावा, शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात रेशीम कोष खरेदी व विक्री करण्याची शासनाने परवानगी द्यावी, गेवराई शहरातील सांडपाणी व मलनिस्सरण करून दुर्गंधीमुक्त स्वच्छ व सुंदर गेवराई करण्यासाठी गेवराई नगर पालिकेला भुमिगत गटार योजना राबविण्यासाठी निधी मंजुर करावा आणि कुसूम सौरपंप योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मागेल त्याला सौरपंप योजनेत समाविष्ट करून तात्काळ सौरपंप उपलब्ध करून देण्याची मागणी गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली. राज्यपालाच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान ते बोलत होते.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीलाच विधानसभा मतदार संघातील सार्वजनिक महत्वाचे विषय विधिमंडळात मांडले. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होत त्यांनी महायुती सरकारचे अभिनंदन करून त्यांना समर्थन दिले. शासनाने जालना येथे रेशीम कोषाची खुली बाजारपेठ उभारल्याबद्दल सरकारचे अभिनंदन करून गेवराई येथे सुध्दा रेशीम कोष खरेदी व विक्री करण्यासाठी बाजारपेठ सुरु करण्यासाठी परवानगी देण्याची विनंती केली. यावेळी बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यात ४ हजार एकरपेक्षा जास्त क्षेत्रावर रेशीमशेती केली जाते. सतराशेहून अधिक नोंदणीकृत शेतकरी या उद्योगात सहभागी आहेत. ऊस, कापूस यांसारख्या नगदी पिकांबरोबरच रेशीमशेती हा नवीन पर्याय शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी चालना देणारा ठरत आहे. केवळ गेवराई तालुक्यात या उद्योगात सुमारे १२० कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल होत असल्याचे सांगताना आ.विजयसिंह पंडित यांनी रेशीम शेतीचे अर्थशास्त्र सभागृहासमोर मांडले. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीने रेशीम कोष खरेदी विक्रीसाठी खुली बाजारपेठ सुरु करण्यासाठी दाखल केलेला प्रस्ताव मंजुर करून गेवराईत रेशीम खरेदी केंद्र सुरु करण्याची आग्रही मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी केली.

शहरी भागात उत्तम पायाभूत सुविधांद्वारे नागरीकांचे जीवनमान सुधारण्यासाठी महायुती सरकार नगरोत्थान अभियान प्रभावीपणे राबवित असल्याबद्दल आ.विजयसिंह पंडित यांनी शासनाचे अभिनंदन केले. या बाबत बोलताना आ.पंडित म्हणाले की, गेवराई ही क-वर्ग दर्जाची नगर परिषद असून येथील नागरीक मात्र पायाभूत सुविधांपासून आजवर वंचित आहेत, शहराचा विकास प्रभावीपणे झालेला नाही त्यामुळे गेवराई शहरातील मलनिस्सारणासह सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करून गेवराई शहर दुर्गंधीमुक्त व स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी गेवराई शहरात भुमिगत गटार योजना राबविण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून त्यास मंजुरी देण्याची आ.विजयसिंह पंडित यांनी मागणी केली.

राज्यातील शेतकऱ्यांना भारनियमन मुक्त व मोफत विज पुरवठा व्हावा या दृष्टीकोनातून मागेल त्याला सौरपंप ही योजना अतिशय उपयुक्त ठरत असल्याचे सांगताना आ.विजयसिंह पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांच्या व्यथा सभागृहात मांडल्या. ७४०० शेतकरी कुसूम सौरपंप योजनेत पात्र असताना ही योजना अचानक बंद झाली, महावितरणने या पात्र लाभार्थ्यांचा समावेश मागेल त्याला सौरपंप या योजनेत करून तात्काळ मुदतीत पात्र लाभार्थ्यांना सौरपंप अस्थापित करून द्यावा अशी मागणी केली.

राज्यपालाच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होत मतदार संघातील सार्वजनिक महत्वाचे विषय सभागृहात मांडल्याबद्दल आ.विजयसिंह पंडित यांचे संबंधितांकडून अभिनंदन होत आहे.



## सद्भावना पदयात्रेमध्ये सहभागी होणार : जायभाये

### बीड शहर बचाव मंच सदैव सद्भावने'सोबतच...!

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय इंदिरा काँग्रेस पक्षाच्या व काही सामाजिक संघटना, इतर काही पक्ष या सर्वांच्या वतीने पुढाकार घेऊन मसाजोग, केज येथून बीड पर्यंत काढण्यात येणाऱ्या सद्भावना' पदयात्रेमध्ये काँग्रेस व इतर मित्र पक्षांचे पदाधिकारी, इंदिरा काँग्रेस पार्टीचे बीड शहराध्यक्ष मा. परवेजभाई कुरैशी, इंटक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामधनभाऊ जमाले तसेच त्यांचे सर्व सहकारी, आमच्या सर्व स्नेही बांधवांच्या आमंत्रणानंतर बीड शहर बचाव मंचाच्यावतीने अध्यक्ष/ निमंत्रक नितीन जायभाये हे सद्भावना पदयात्रेमध्ये सहभागी होणार आहेत, असे प्रस्तुत पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

काही राजकीय नेते पुढारी स्वतःच्या राजकीय महत्त्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करून, विषमतेचे विष समाजामध्ये पसरवून



स्वतःच्या राजकीय पोळ्या भाजण्याचे डाव साधत आहेत. विषमतेचे विष पेरून गढूळ केल्या जात असलेल्या या सामाजिक परिस्थितीमध्ये सर्वसामान्य, निर्दोष माणूस भरडला जात आहे. जाती जातीमध्ये द्वेष निर्माण करण्यासाठी रोज नवीन-नवीन कटकारस्थाने व योजना आखल्या जात आहेत. सामाजिक भेदभाव, जाती जातीमध्ये वाढत चाललेली द्वेष भावना आणि त्यातूनच निर्माण होणारे दुष्परिणाम, अराजकता, कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न, गुन्हेगारी प्रवृत्तीला मिळणारे बळ या सर्व सामाजिक संतुलन नष्ट करणाऱ्या प्रवृत्तींपासून समाजाला व पुढच्या पिढीला वाचविणे गरजेचे आहे. सामाजिक विवेक व लोकांची सदसद्विवेक बुद्धी जागृत ठेवणे गरजेचे आहे. अशाच उदात्त भावनेतून समाजामध्ये न्याय भावना, न्यायव्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी सद्भावना जागृत राहणे गरजेचे आहे. सामाजिक सलोखा, ऐक्य वाढविण्यासाठी सद्भावना यात्रेचे आयोजन उपयुक्त ठरू शकते.

आयोजकांनी 'सदभावना यात्रे'सारखा स्तुत्य उपक्रम हाती घेऊन दिलेल्या आमंत्रणाचे आभार मानून, सद्भावना यात्रेसारखा स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याबद्दलही सर्व आयोजकांचे आभार मानतो. आम्ही सर्व बीड शहर बचाव मंचाचे सर्वच पदाधिकारी तथा सर्व सदस्य आणि सद्भावनेचे खरे अनुयायी म्हणून मोठ्या संख्येने सद्भावना यात्रेमध्ये सहभागी होणार आहोत. तरी बीड शहरातील समस्त समाज बांधवांनी मोठ्या बहुसंख्येने सद्भावना यात्रेमध्ये सहभागी व्हावे असे विनम्र आवाहन बीड शहर बचाव मंचच्या वतीने करण्यात येत आहे.

## श्रीकृष्ण मंदिर परिसरात हाय मस्ट दिवे बसवून हजरत शाह शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तानची सफाई करण्यात यावी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील हत्ती खाना येथील श्रीकृष्ण मंदिर परिसरात पाच हाय मस्ट दिवे बसवून येथील हजरत शाह शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तान ची सफाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगर परिषदेत करण्यात आली आहे.

बीड शहरातील हत्ती खाना येथे श्रीकृष्ण मंदिर असून या ठिकाणी श्री चक्रधर स्वामी महाराजांनी चार महिने वास्तव्य केला असून येथे महानुभावी पंथाचे आश्रम सुद्धा आहे.श्रीकृष्ण मंदिर येथे बीड जिल्ह्यातूनच नव्हे तर राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात या ठिकाणी हाय मस्ट दिवे बसवण्याची गरज असून आपण आपल्या कार्यालय मार्फत श्रीकृष्ण मंदिर परिसरात हाय मस्ट दिवे बसविण्यात यावे व त्याचप्रमाणे हत्ती खाना येथील हजरत शाह शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तान सुद्धा असून सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजानचा महिना सुरू असून रमजान निमित्त कब्रिस्तान येथे दूरुद - फातीहा पठण करण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने येत असतात तरी या ठिकाणी साफसफाई करण्याची गरज आहे.



तरी बीड शहरातील हत्ती खाना येथील श्रीकृष्ण मंदिर, निळकंठेश्वर मंदिर,खासबाग देवी मंदिर परिसरात हाय मस्ट दिवे बसवून येथील हजरत शाह शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तान ची सफाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वर्षाताई जगदाळे (महिला राज्य उपाध्यक्ष) सदाशिव बिडवे (जिल्हा उपाध्यक्ष) यांच्या प्रमुख उपस्थितीत अरमजान पठाण (बीड शहराध्यक्ष) यांचे नेतृत्वाखाली बीड नगरपरिषद कार्यालयाचे उपमुख्य अधिकारी सम्राट कदम यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी मोहज्जीब इनामदार, दत्तात्रेय डावकर सही तर कार्यकर्ते उपस्थित होते.



## केज येथे संविधान गौरव महोत्सवानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा

केज । प्रतिनिधी

केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज येथे संविधान गौरव महोत्सव २०२५ अंतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा काल घेण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा खुली होती. स्पर्धेतील सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचे होते. विद्यार्थ्यांना संविधान, त्याचा इतिहास, मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि भारताच्या लोकशाही व्यवस्थेशी संबंधित प्रश्न विचारण्यात आले. स्पर्धेच्या माध्यमातून संविधानाविषयी मूलभूत माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि आपल्या ज्ञानाची परीक्षा पाहण्याची संधी साधली. प्रश्नमंजुषेतील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहे. तसेच, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. संविधान हा आपल्या देशाचा आधारस्तंभ आहे. त्याचे योग्य आकलन आणि पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. अशा प्रकारच्या प्रश्नमंजुषा स्पर्धांमुळे संविधानाविषयीची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत सहज आणि रोचक पद्धतीने पोहोच करण्यात आली. या आयोजन करून संविधान जागरूकता वाढवण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. फावडे एम. जी. यांनी मार्गदर्शन केले. या प्रश्नमंजुषेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना (छ्ड्ड) विभाग, वाणिज्य विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. डॉ. श्याम सरसरे, प्रा. यादव जी. बी., वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. आगळे एस. व्ही., प्रा. डॉ. काळम पी. जी., राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. गालफाडे ए. बी., प्रा. डॉ. शिंदे एस. के. आदींनी परिश्रम घेतले.

## मराठा सेवा संघाची केज येथे बैठक

केज । प्रतिनिधी

मराठा सेवा संघाची बैठक केज येथे सोमवार रोजी संपन्न झाली. बैठकीचे अध्यक्ष मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव होते. यावेळी विविध पदाधिकाऱ्यांची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवश्री नागनाथ जाधव जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे विष्णू तपसे, हनुमंत घाडगे, हनुमंत भोसले, गोविंद सपाटे, राधाताई सपकाळ, हिराबाई शेळके, गोविंद शिनगारे आदींची उपस्थिती होती.

येणाऱ्या कालावधीत होणारी जिजाऊ प्रबोधन यात्रा विषयी चर्चा करुन या प्रबोधन यात्रेचे विविध ठिकाणी तालुक्यामध्ये विविध प्रकारे स्वागत, कार्यक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले. मराठा सेवा संघ शिवधर्म संस्कार विधी नामदेव तुकोबा विचार कृती प्रणित, क्रांतीसिंह

### विविध पदाधिकारी कार्यकारिणी जाहीर


नाना पाटील शिवसेवक जिल्हाध्यक्ष बीड पूर्व साठी योगेश्वर महाराज आंबाड यांची निवड करण्यात आली. किशोर भालेराव यांची तालुका उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. अश्विन टोपे यांची तालुका उपाध्यक्ष तर तालुका सचिव विष्णू यादव, तालुका कोषाध्यक्ष धनराज इंगोले, तालुका कार्याध्यक्ष शशिकांत जाधव, तालुका संघटक तुषार पाटील, मनोज भोसले केज शहराध्यक्ष, संतोष काका जगदाळे-सदस्य पदी निवड करण्यात आली. याप्रसंगी नूतन पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ पुस्तक नियुक्तीपत्र देऊन स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन युवराज हिरवे यांनी केले आभार विष्णू यादव यांनी मानले. यावेळी विष्णू आबा तपसे, बाळासाहेब सोनवणे, मनोज भोसले, तालुकाध्यक्ष जयराम देशमुख, अभय देशमुख, उत्तरेश्वर भोसले, संजय तपसे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## भरउन्हाळ्यात कडक हिवाळा; रोजेदारांनो तब्येत सांभाळा : एस.एम.युसूफ

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून मध्यरात्रीनंतर प्रचंड मोठ्या प्रमाणात थंड पडू लागली आहे. अशा प्रकारे अचानक वातावरण बदलल्याने भर उन्हाळ्यात हिवाळा जाणवू लागला आहे. सध्या इस्लाम धर्मातील पवित्र रमज़ान महिना सुरू असल्याने मुस्लिम समाज रमज़ानचे रोज़े ठेवतो आहे. बदललेल्या या वातावरणात रोज़्यांवर विपरीत परिणाम होऊ नये याकरिता रोज़ेदारांनी तब्येत सांभाळावी असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

निसर्गात अचानकपणे कधी काय बदल होतील हे सांगता येत नाही. सध्या उन्हाळ्याचा हंगाम असून दिवसभर कडक ऊन आणि उकाडा होत आहे. मध्यरात्रीनंतर मात्र वातावरणात मोठा बदल होऊन चक्क हिवाळ्यापेक्षाही जास्त मोठ्या प्रमाणात थंड पडू लागली आहे. पहाटे फ़ज्र




नमाज़च्या वेळी तर अक्षरशः अंगावर बर्फ टाकत असल्यासारखे गार वातावरण होऊ लागले आहे. यामुळे लोकांच्या तब्येतीवर या बदलाचा परिणाम मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. त्यात सध्या रमज़ानचा महिना सुरू असल्याने मुस्लिम समाज रमज़ानचे पवित्र रोज़े ठेवत आहे. रोज़ामध्ये शरीरात उष्णता वाढते म्हणून मुस्लिम समाजाचा रोज़ा सोडताना शरीरातील उष्णतेला कमी करण्यासाठी थंड पेयासह टरबूज, खरबूज यासारखी फळे फ्रिजमध्ये ठेवून ती थंड करून खाण्याकडे कल असतो. तसेच वातावरणातील दाहकता कमी करण्यासाठी दिवसभर पंखे, कुलर, असल्यास एसी चालविण्यावर भर असतो. उन्हाळ्यात या कृतीमुळे सहसा तब्येतीवर काही परिणाम होत नाही परंतु सध्या उन्हाळ्याच्या दिवसात दिवसभर जरी कडक ऊन पडत असले, उकाळा असला तरी मध्यरात्री नंतर मात्र अचानक हिवाळा सुरू झाला आहे. अशा वातावरणामध्ये थंड पेय आणि फ्रिज मध्ये ठेवलेले टरबूज, खरबूज आणि तत्सम फळे खाल्ल्याने रोज़ेदारांच्या तब्येतीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. ज्यात प्रामुख्याने सर्दी, पडसे, खोकला, डोकेदुखी, अंगदुखी इत्यादी होऊ शकतात. ज्यामुळे रोज़ेदारांचे रोजे बाधित होऊ शकतात. असे होऊ नये याकरिता रोज़ेदारांनी रोज़े ठेवण्याबरोबरच वातावरण बदलाकडेही कटाक्षाने नजर ठेवून त्याप्रमाणे आपले खान-पान व राहणीमान ठेवावे अन्यथा तब्येत बिघडल्यास लाख मोलाचे पवित्र रमज़ानचे पवित्र रोज़े ठेवण्यापासून वंचित रहावे लागू शकते. तेव्हा अशा वातावरणात रोजेदारांनी तब्येतीची काळजी घ्यावी असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT